दिनांक 01/09/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.32

विषय – सन 2022-2023 ते 2025-2026 अखेरची चतुर्थ वार्षिक कर आकारणीच्या दर वाढीस मंजूरी देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – दिनांक 29/08/2022 रोजीची कर अधिक्षक व मुख्याधिकारी यांची टिपणी.

नगरपरिषद हद्दीतील मिळकतींची महारष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 124 (2) नुसार दर चार वर्षांनी करपात्र मूल्यांकनामध्ये सुधारणा करण्याची तरतूद आहे.त्याप्रमाणे यापुर्वी सन 2018-19 ते 2021-22 या वित्तीय वर्षासाठी नगरपरिषदेने करपात्र मूल्यामध्ये वरील नियमानुसार सुधारणा केली होती.सदर चतुर्थ वार्षिक कर आकारणीची मुदत दिनांक 31/03/2022 अखेर संपलेली आहे. तरी नगरपरिषदेचे उत्पन्न वाढीसाठी चतुर्थ वार्षिक कर आकारणी सन 2022-23 ते 2025-26 वर्ष अखेर करपात्र मूल्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

तरी मालमत्ता कर आकारणी करपात्र मूल्य निश्चिती संबंधी दरपत्रकात 10% वाढ दिलेस नगरपरिषदेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडणार आहे.याकामी प्राधिकृत मूल्य निर्धारण अधिकारी तथा सहाय्यक संचालक मूल्यनिर्धारण अधिकारी, सांगली यांचेकडे प्रारूप दरपत्रक पाठविणे व दरपत्रकातील प्रस्तावित दर वाढीस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-

( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा